RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक ३(९)] शुक्रवार, जानेवारी १९, २०२४/पौष २९, शके १९४५ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक १४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.—**महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम . — **पृष्ठे** १-२

दिनांक १८ जानेवारी २०२४ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सतिश वाघोले,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **“ महाराष्ट्र शासन राजपत्रात ”** दिनांक १९ जानेवारी २०२४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

२०१६ चा महा. २६.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ यात सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र विद्युत शुल्क (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ३ मधील, पोट-कलम (२) मध्ये, खंड (सात) मधील, " मेट्रो रेल्वे व मोनोरेल वगळता " हा मजकूर वगळण्यात येईल. २०१६ चा महा. २६.

सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ यामध्ये नवीन कलम १५क समाविष्ट करणे.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईलः—

शंका निरसन.

"**१५क.** शंका निरसनार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येते की, या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, जी वीज,—

(क) भारत सरकारद्वारे वापरली जाते किंवा त्या सरकारच्या वापराकरिता भारत सरकारला विकली जाते, किंवा

(ख) भारत सरकारच्या कोणत्याही रेल्वेचे, मेट्रो रेलचे किंवा मोनो रेलचे बांधकाम, देखभाल किंवा कार्यान्वयन करताना वापरली जाते अथवा कोणत्याही रेल्वेचे, मेट्रो रेलचे किंवा मोनो रेलचे बांधकाम, देखभाल किंवा कार्यान्वयन करताना वापरण्यासाठी विकली जाते,

अशा विजेच्या (मग तिचे उत्पादन शासनाने किंवा इतर व्यक्तीने केलेले असो) वापरावर किंवा विक्रीवर कर लादण्यात येणार नाही किंवा कर लादण्यास प्राधिकृत करण्यात येणार नाही.".

सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या **अनुसूची क** ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमास जोडलेल्या **अनुसूची क** मधील, "भाग छ-मोनो व मेट्रो रेल्वे" याच्याशी संबंधित असणारी अनुक्रमांक ७ येथील नोंद वगळण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.